NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(सायंकाळ)

दिनांक १९.१०.२०२६ सोमवार

१) मा. न्यायालयातुन आरोपीला सश्रम कारावासाची शिक्षा :–

दिनांक १९.१०.२०२६ रोजी मा. अति. जिल्हा व सत्र न्यायाधीश–१५, तथा विशेष न्यायाधिश पोक्सो कोर्ट, नागपुर, श्रीमती एच. ए. अन्सारी मॅडम यांनी त्यांचे कोर्टाचे विशेष केस क्र. ५५६/२०२३ मधील, पोलीस ठाणे जुनी कामठी येथील अप. क्र. ३५८/२०२३ कलम ३९२, ३५४, ३४ भा.दं.वि., सहकलम ८ पोक्सो सहकलम १३५ म.पो.का. या गुन्ह्यातील आरोपी अतुल अशोक भोंडेकर, वय ३३ वर्षे, रा. खैरी गाव, कामठी, नागपूर याचेविरूध्द साक्षी पुराव्याअंती गुन्हा शाबीत झाल्याने, **आरोपीस कलम ३९२ भा.दं.वि. कायद्यान्वये ०३ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा व २,०००/– रू. दंड आणि दंड न भरल्यास १ महिना अतिरीक्त कारावासाची शिक्षा तसेच, कलम ३५४ भा.दं.वि. कायद्यान्वये ०१ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा व २,०००/– रू. दंड आणि दंड न भरल्यास १५ दिवस अतिरीक्त कारावासाची शिक्षा व कलम ८ पोक्सो कायद्यान्वये ०३ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा व २,०००/– रू. दंड आणि दंड न भरल्यास ०१ महीना अतिरीक्त कारावासाची शिक्षा ठोठावली.**

दिनांक १४.०८.२०२३ चे १४.०० वा ते १४.३० वा. चे दरम्यान, फिर्यादी कुणाल ज्ञानेश्वर मंचलवार, वय २३ वर्षे, रा. संजय गांधी नगर, राणी दुर्गावती चौक, यशोधरानगर, हे त्यांचे मैत्रीणीसोबत तिचे मावशीचे घरी दुचाकी वाहनाने जात असतांना, पोलीस ठाणे जुनी कामठी हद्दीत खैरी शिवार रोडवर, वारेगांव टर्निंग वर आरोपी व त्याचा साथीदार (मृतक) धर्मराज लक्ष्मण थोरवे, वय २७ वर्षे यांनी तयोना थांबवुन, फिर्यादीस चाकुचा धाक दाखवुन, फिर्यादीजवळील रोख ४,६००/–रू. व मोबाईल हिसकावुन घेतला. तसेच, तुझे सोबतचे मुलीला आमच्यासोबत पाठव असे म्हणुन मुलीचा हात धरून, तीचे मनास लज्जा येईल असे कृत्य करून, तीचा विनयभंग केला. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे जुनी कामठी येथे आरोपीविरूध्द गुन्हा नोंदविण्यात आला होता. आरोपींना दिनांक १६.०८.२०२३ रोजी अटक करण्यात आली होती.

गुन्ह्याचे तपासी अधिकारी तत्कालीन पोउपनि. दिलीप थोरवे यांनी मा. कोर्टात तपासाअंती दोषारोपपत्र सादर केले होते. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता म्हणून ॲड. श्रीमती योगीता राऊत यांनी तर, आरोपीतर्फे ॲड. श्री. राजुरकर यांनी काम पाहिले. सदर गुन्ह्यात कोर्ट पैरवी अधिकारी पोहवा. ज्ञानेश्वर गायधने यांनी काम पाहिले.

२) उत्कृष्ट तपास करणारे व पदोन्नती प्राप्त अधिकारी व अंमलदार यांचा मा. अपर पोलीस आयुक्त उत्तर प्रादेशिक विभाग यांचे हस्ते गौरव :–

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय, उत्तर प्रभाग अंतर्गत येणारे पोलीस ठाणे लकडगंज व खापरखेडा येथे दाखल असलेल्या गुन्हयातील आरोपींचा शोध घेऊन गुन्हा उघडकीस आणून गुन्हयातील मुद्येमाल हस्तगत करणारे पोलीस अधिकारी व अंमलदार यांचा आज दिनांक १९.१०.२०२६ रोजी मा. श्रीमती विनीता शाहु, अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग) नागपूर शहर यांनी त्यांचे कार्यालयात प्रशस्तीपत्र देऊन गौरव केला.

पोलीस ठाणे लकडगंज येथील श्री. राजेश उर्फ राजूभाई पंड्या हे बेपत्ता झाल्याने त्याबाबत अप. क्र. ५९७/२०२६ कलम १३८, १४०(३) भा.न्या.सं. अन्वये दाखल करण्यात आला होता. राजेश उर्फ राजूभाई पंड्या यांचा सामाजिक व राजकीय स्तरावरील महत्व, परिचीतांचे मोठे जाळे व कुटुंबीयांची चिंता विचारात घेता सदर प्रकरणातील बेपत्ता व्यक्ति यांचा शोध घेणे पोलीसांसमोर आव्हान होते. सदर प्रसंगी पो. ठाणे लकडगंज येथे अधिकारी व अंमलदार यांनी ३७ दिवस सक्रीयतेने तपास व सर्व दिशेने प्रभावी प्रयत्न करून यातील बेपत्ता व्यक्ति यांचा शोध लावून उल्लेखनीय कामगिरी केली आहे. सदर उल्लेखनीय कामगिरीबद्दल, वपोनि. श्री. मुकुंद कवाडे, पोउपनि. बालाजी माने, पोहवा. आनंद मनसकुले, प्रकाश सुरजूसे, लक्ष्मण परतेती, राकेश तिवारी, विशेष शाखा, पोअं. मयुर बन्सोड, विशाल ठाकरे, महेन्द्र सेलुकर यांना प्रशंसापत्र व पुष्पगुच्छ प्रदान करून सत्कार करण्यात आला.

पोलीस ठाणे खापरखेडा, नागपूर शहर येथे दाखल अप.क्र. २१२/२०२६ कलम १०३(१), १०९, ३(५) भान्यासं.अन्वये गंभीर स्वरूपाचा खुनाचा गुन्हा दाखल झालेला होता. सदरच्या गुन्हयात अत्यंत कौशल्यपुर्ण रीतीने तपास करून सदरचा क्लीष्ट स्वरूपाच्या गुन्ह्यात सतत प्रयत्न करून ६ महिन्यानंतर उघडकीस आणुन यातील अज्ञात आरोपीतांचा माग काढुन त्यास अत्यंत शिताफीने ताब्यात घेतले. सदर उल्लेखनीय कामगिरीबद्दल, वपोनि. श्री. संदिप बुआ, पोहवा. मंगेश लांजेवार, शोएब शेख, पोअं. बादल गिरी, विशाल नाखले, सुरज कांबळे यांना प्रशंसापत्र व पुष्पगुच्छ प्रदान करून सत्कार करण्यात आला.

तसेच, पदोन्नती प्राप्त सफौ. अमरसिंग ठाकूर, पो. ठाणे शांतीनगर, सफौ. ओमप्रकाश त्रिवेदी, सफौ. दिपक मेश्राम पो. ठाणे तहसील यांची पोलीस हवालदार पदावरून सहा. पोलीस उपनिरीक्षक पदी पदोन्नती झाल्याने त्यांना पदचिन्ह लावुन, त्यांना सुभेच्छापत्र व पुष्पगुच्छ प्रदान करून सत्कार करण्यात आला.

मा. श्रीमती विनीता साहू, अपर पोलीस आयुक्त, उत्तर प्रादेशिक विभाग, नागपूर शहर यांनी ०२ पोलीस अधिकारी व १६ पोलीस अंमलदारांना त्यांच्या उत्कृष्ट, धाडसी व परिणामकारक कामगिरीबद्दल प्रशंसापत्र व पदोन्नती संबंधाने सुभेच्छापत्र आणि पुष्पगुच्छ देवुन सन्मानित केले. तसेच, त्यांच्या कार्याचे अभिनंदन करून, त्यांच्या तपास कौशल, कर्तव्यतत्परता व धाडसपणाचे कौतुक केले व यापुढेही गुणवत्तापूर्ण व लोकाभिमुख कामगिरी करण्यासाठी सर्वांना प्रोत्साहित केले.





(कामगिरी)

<u>१) यशोधरानगर पोलीसांची कामगीरी :– घरफोडी करणाऱ्या आरोपींना अटक. ०४ गुन्हे उघडकीस</u>

पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीत, आला हजरत मस्जीदजवळ, रहमतनगर, माजरी येथे राहणारी फिर्यादीची बुआ नामे मों. मुशतफ मुमताज अहमद वय ४८ वर्षे हया सौदी अरेबीया येथे उमरा करण्याकरीता २५.०९.२०२६ रोजी परिवारासह गेल्या होत्या. घराची देखरेख करण्याकरीता त्यांनी बहिणीचा मुलगा मुबशीर रजा

अब्दुल लतीक यास ठेवलेले होते. दिनांक १४.१०.२०२६ चे ००.०१ वा. ते दिनांक १५.१०.२०२६ चे १२.०० वा. चे दरम्यान, बहिणीचा मुलगा मुबशीर याने घराला कुलुप लावुन तो मुंबई येथे गेला असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे बुआचे घराचे मुख्य दाराचे कुलूप तोडून, आत प्रवेश करुन, बेडरुममधील कपाटातील रोख ३,२५,०००/—रू. तसेच, चांदीचे दागिने असा एकुण किंमती ३,३०,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला. फिर्यादी नसीफ अंसारी मों. वकील वय ३० वर्षे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे यशोधरानगर येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासादरम्यान यशोधरानगर पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून, मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, आरोपी १) सागर उर्फ मंडला विजय रंभाडे वय २४ वर्षे रा. पाचपावली पहिले फाटक, कार्पोरेशन गोडावुन जवळ, पाचपावली, नागपुर २) सहेबान वकील अंसारी वय २७ वर्षे, रा. जोशीपुरा, यादव तबेलाजवळ, यशोधरानगर, नागपुर यांना ताब्यात घेतले. आरोपींना विचारपुस केली असता, त्यांनी वर नमुद गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपींचे ताब्यातुन चांदीचे पायपट्टाचे तुकडे मिळुन आले. आरोपींना अधीक विचारपुस केली असता त्यांनी वरील गुन्हयाव्यतीरीक्त पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीतुन ॲक्टीव्हा मोपेड क्र. एमएच ४० एडी ३३११ चोरी केल्याची तसेच पोलीस ठाणे पाचपावली हद्दीतुन सुझुकी जिक्सर क्र. एमएच ४९ बीएस ९९६८ चोरी केल्याची व पोलीस ठाणे अजनी हद्दीतुन याम्हा मोटर सायकल क्र. एमएच ३२ एवाय ४३८४ असे एकुण ०३ वाहने चोरी केल्याची कबुली दिली. आरोपींचे ताब्यातुन एकुण ३,११,५००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त, मा. श्री वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त (दक्षीण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री नित्यानंद झा, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ५), मा. श्री. रोहित ओव्हाळ, सहा. पोलीस आयुक्त (कळमणा विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. श्री युनुस शेख, पोनि. गुन्हे विवेकानंद भारती, पोउपनि अनंत पाटील, पोहवा. राहुल बोंदरे, अशोक तायडे पोअं. मनिष झरकर, संदीप वानक्षेडे, शितेस चौरसीया, भुषण येरोजवार, प्रवीण इनवाते यांनी केली.



(गुन्हे)

<u>पोलीस ठाणे कपीलनगर :— शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.</u>

दिनांक १९.१०.२०२६ चे १३.४५ वा. चे सुमारास, कपीलनगर पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना सहारे पेट्रोल पंप जवळ, विटाभट्टी, स्वामी नगर कडे जाणारे रोडवरील एका

झाडाखाली एक ईसम संशयीतरित्या फिरत आहे, अशा माहीतवरून, नमुद ठिकाणी गेले असता, तेथे प्राप्त वर्णनाचा ईसम पोलीसांना पाहुन आपले हातातील शस्त्र फेकुन पळु लागला. त्याचा पाठलाग करून त्यास ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव दयाशंकर उर्फ सागर संतोष बघेल, वय २३ वर्षे, रा. बिल्डींग नं. ४७, क्वॉर्टर नं. ७३१, म्हाडा क्वॉलोनी, कपीलनगर, नागपुर असे सांगीतले. त्याचे ताब्यातुन एक लोखंडी चाकु किंमती ४००/—रू. चा मिळून आल्याने जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु बाळगून समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे पोअं. सागर बघेल यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कपीलनगर येथे पोवहा. अक्षय सहारे यांनी आरोपीविरूध्द कलम २२३ भान्यासं. सहकलम ४, २५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

(ईतर)

<u>आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—</u>

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

अ	कोर्टाचे नाव	केस क्र.	कलम	आरोपीचे नाव व पत्ता	पेशी तारीख
१.	मा. जिल्हा व सत्र न्यायाधिश— १२ साहेब, नागपुर.	५८३/२०२०	कलम ४९८(अ), ३४ भा.दं.वि.	योगेश तुळशिराम चाफेकर, वय ३६ वर्षे, रा. २७, राष्ट्रसंत तुकडोजी नगर, पांडुरंग हॉल जवळ, गोधनी रोड, नागपुर.	२१.१०.२०२६
२	मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट क्र. ३, नागपुर.	३०२६२६/२००९	कलम ४६१, ३८० भा.दं. वि.	शिवा डिसोवा यादव, वय १८ वर्षे, रा. डिप्टी सिग्नल, बाजार चौक, कळमना, नागपुर.	२५.११.२०२६
३	मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट क्र. ३, नागपुर.	२०२८०७/२०११	कलम ४५४, ४५७, ३८०, ३४ भा.दं.वि.	मनोज मुकेश यादव, रा. मिनीमाता नगर, पारस गल्ली, सागर पानठेल्यामागे, नागपुर.	२५.११.२०२६
४	मा. अती. मुख्य न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर.	३०४१९९/२००६	कलम ८२ सिआरपिसी प्रमाणे	सत्यपाल पि. नागपुरे, वय १९ वर्षे, रा. देशपांडे ले—आऊट, नाल्याजवळ, नंदनवन, नागपुर.	०३.११.२०२६

स्वा/—
(अंकुश राठोड)
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.